सोलापूर विद्यापीठ
**परीक्षा विभाग**
सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव,
सोलापूर - ४१३ २५५
ईपीएबीक्स - ०२१७ -२७४४७६०/६१/६३/६६/७१/७२/७३/७४/७८/७९
फॅक्स नं. - ०२१७-२७४४७७०
संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in
ई-मेल: coe@sus.ac.in

सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

**Solapur University**
**Examination Section**
Solapur-Pune National Highway, Kegaon,
Solapur-413 255
EPABX No.0217- 2744760/61/63/66/71/72/73/74/74/79
Fax No.0217-2744770
Web Site : http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in
email id: coe@sus.ac.in

**संदर्भ क्रमांक . सोविसो/परीक्षा विभाग /२०१७-१८/** 2478 दि. 11 OCT 2017

प्रति,
**मा. प्राचार्य / मा.संचालक,**
सोलापूर विद्यापीठांशी संलग्नित सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था

**विषय:** जुन्या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांनी नवीन अभ्यासक्रमाप्रमाणे समकक्ष विषयाची परीक्षा देण्याबाबत...

**महोदय,**

उपरोक्त विषयानुसार आपणास आदेशाद्वारे कळविण्यात येते की, प्रत्येक विद्याशाखेतील अभ्यासक्रम प्रति तीन वर्षाने किंवा त्याहून कमी कालावधीत ही सुधारीत केली जातात. **प्रत्येक वर्गातील अभ्यासक्रम हा सुधारीत झाल्यानंतर जुन्या अभ्यासक्रमानुसार दोन संधी उपलब्ध करुन दिल्या जातात. यामध्येही विद्यार्थी अनुत्तीर्ण राहिल्यास त्यास नविन अभ्यासक्रमाप्रमाणे त्या त्या विषयाच्या समकक्ष विषयाची परीक्षा देणे अनिवार्य असते.**

वरील बाबींच्या अनुषंगाने, बी.ए./बी.कॉम/बी.एस्सी या अभ्यासक्रमाची माहे ऑक्टो/नोंव्हें 2017 ची सत्रनिहाय परीक्षा दि 24/10/2017 पासून सुरु होत आहे. आपल्या महाविद्यालयात 2010, 2013 व सीजीपीए पॅटर्नचे विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ होत असतील तर त्यांनी खालील नमुद केलेल्या तक्त्याप्रमाणे त्या त्या सत्रातील विषयाप्रमाणे परीक्षा देणे अनिवार्य आहे. या करीता खालीलप्रमाणे स्पष्टीकरणार्थ तपशील असे.

| Class | Pattern | For which Pattern student have to be Appear | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Sem -I | Sem -II | Sem -III | Sem -IV | Sem -V | Sem -VI |
| B.A., B.Com & B.Sc. | 2010 | CBCS | 2014 CGPA | 2014 CGPA | 2014 CGPA | 2014 CGPA | Chance is available as per 2013 |
| | 2013 | CBCS | 2014 CGPA | 2014 CGPA | 2014 CGPA | 2014 CGPA | Chance is available as per 2013 |
| | CGPA | CBCS | 2014 CGPA | 2014 CGPA | 2014 CGPA | 2014 CGPA | Chance is available as per CGPA |

| Class | Pattern | For which Pattern student have to be Appear | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Sem -I | Sem -II | Sem -III | Sem -IV |
| M.A / M.Com | 2010/2013 | 2015 CBCS | 2015 CBCS | 2015 CBCS | 2013 |

वरीलप्रमाणे इतर अभ्यासक्रमाच्या जसे बी.बी.ए./बी.सी.ए./विधी/बी.फॉर्म/अभियांत्रिकी/एम.एस्सी/एम.सी.ए व उर्वरित सर्व अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना जुना अभ्यासक्रमाप्रमाणे दोन संधी संपल्यानंतर त्या त्या पॅटर्नप्रमाणे अस्तित्वात असलेल्या पॅटर्नमधील समकक्ष विषयांची परीक्षा देणे आवश्यक असेल याची नोंद घ्यावी. तसेच तंत्रिक अडचणीमुळे जुन्या अभ्यासक्रमातील ऑनलाईन या संगणकीय कार्यप्रणालीद्वारे तयार झालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रावर जुन्या पॅटर्नच्या अभ्यासक्रमाप्रमाणे विषयाची नावे छापली गेलेली असून त्यासमोर परीक्षेचे दिनांक वेळ छापली गेली नसल्यामुळे विद्यार्थ्यांनी त्या त्या पॅटर्नमधील समकक्ष विषयाच्या अभ्यासक्रमाप्रमाणे संकेतस्थळावर उपलब्ध असलेले वेळापत्रक पाहून संबधीत समकक्ष अभ्यासक्रमाची परीक्षा द्यावी.

**जुन्या अभ्यासक्रमातील प्रवेशपत्र वितरित करतेवेळी वरील बाब विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देवून त्यांना समकक्ष विषयाची संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या वेळापत्रकाप्रमाणे परीक्षा देण्याच्या सूचना द्याव्यात. तसेच 2010, 2013 व CGPA व इतर जुन्या अभ्यासक्रमाच्या पॅटर्नमधील विद्यार्थ्यांना त्या त्या सत्र परीक्षेचे वाटप ही वरीलप्रमाणेच किंवा समकक्ष विषयाप्रमाणे करावे.**

सदरील बाब ही विद्यार्थी, पालक, शिक्षक, वेळोवेळी नियुक्त केले जाणारे अंतर्गत/ बहिस्थ वरिष्ठ पर्यवेक्षक व परीक्षेशी निगडीत सर्व घटकांच्याही सत्वर निदर्शनास ~~सत्वर~~ आणावी.

आपला विश्वासू,

**(बी. पी. पाटील)**
संचालक
परीक्षा व मुल्यमापण मंडळ

**प्रत माहितीस्तव:**
1. परीक्षा विभागातील संबधीत विभाग
2. अभ्यासमंडळे विभागास व योग्यत्या कार्यवाहीस्तव